**<u>सन 2021-22 ते सन 2024- 2025 वर्षासाठी सोलापूर जिल्हयातील पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळू/रेतीगट निर्गतीकरिता ई-निविदा (E-Tendering) व ई-लिलावाची (E-Auction) अधिसुचना.</u>**

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर.
क्र.मशा/कार्या-1/गौख/आरआर- 3728
दि. 31 / 12 /2021

# <u>शुध्दीपत्रक (Corrigendum)</u>

**<u>परिशिष्ट-1</u>**

या कार्यालयाकडुन दि.24.12.2021 रोजी सोलापूर जिल्हयातील वाळू लिलावासंदर्भात प्रसिध्द जाहिराती अन्वये सन 2021-22 या वर्षाच्या लिलावाकरिता जाहिरात, परिशिष्ट-1, अटी व शर्ती प्रसिध्द करणेत आलेली आहे.

1) परिशिष्ट-1 मध्ये **लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता, अटी व शर्ती** (Technical bid documents) मध्ये (2) (b) "वस्तु व सेवाकर विभागाचा TIN क्रमांक" व (e) मध्ये "GST क्रमांक" असे नमुद केलेले आहे,

त्याऐवजी वरीलप्रमाणे **(2) (b) मध्ये "वस्तु व सेवाकर विभागाचे GSTIN क्रमांक" असे वाचावे व (e) मध्ये "GST प्रमाणपत्र"** (certificate) असे वाचावे.

2) परिशिष्ट-1 मध्ये (2) (c) मध्ये "व्यक्तीसाठी रेतीगट मुल्याच्या किमान 5 टक्के व संस्था व कपंनीसाठी रेतीगट मुल्याच्या किमान 10 टक्के उलाढाल असलेचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र पात्रतेसाठी दाखल" असणेबाबत नमुद केलेले आहे.

त्याऐवजी "व्यक्तीसाठी एका वाळूगटाच्या <u>upset price</u> मूल्यांच्या 5% उलाढाल असलेले सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र व वैयक्तिक लिलावधारकाला जर एकापेक्षा अधिक वाळूगटासाठी बोली / निविदा भरवयाचा झालेस तर जेवढया वाळूगटांची लिलावात बोली लावली आहे त्या सर्व वाळूगटाच्या मिळुन एकुण upset price मुल्याच्या 5% रकमेएवढे उलाढाल असलेचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील" असे वाचावे.

तसेच "संस्था व कपंनीसाठी एका वाळूगटाच्या <u>upset price</u> मूल्यांच्या 10% उलाढाल असलेले सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र व संस्था व कपंनी यांना जर एकापेक्षा अधिक वाळूगटासाठी बोली / निविदा भरवयाचा झालेस तर जेवढया वाळूगटांची लिलावात बोली लावली आहे त्या सर्व वाळूगटाच्या मिळुन एकुण upset price मुल्याच्या 10% रकमेएवढे उलाढाल असलेचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील" असे वाचावे.

3) तसेच वाळूघाट ई-निविदा /ई-ऑक्शन धारकाने स्वखर्चाने रु.500/- प्रतिज्ञापत्रावर द्यावयाच्या हमीपत्रामधील मुद्या क्र.5 मध्ये "मी/आम्ही असेही घोषित करतो की, मला यापुर्वी महाराष्ट्र राज्याच्या कुठल्याही जिल्हयात कोणत्याही कारणास्तव **<u>राहील</u>**. लिलावप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रतिबंध (काळया यादीत) केलेले नाही" असे नमुद आहे. सदर वाक्यामधील "**<u>राहील</u>**" हा शब्द वगळणेत यावा.

**सही/*****
**(संजीव जाधव)**
**अपर जिल्हाधिकारी, सोलापूर.**